# बार्शिटाकळी नगरपंचायत

"न प्रजाहिते श्रमविक्लवः"

**बार्शिटाकळी जि.अकोला.**

**दुरध्वनी क्र.07255-252825**

**Email:** nagarpanchayat.barshitakali@gmail.com


---

जाक्र/नपबा/आरोग्य विभाग/ई-निविदा/२०२६/६८८ दिनांक-१५/०५/२०२६

## ई निविदा सुचना

मुख्याधिकारी बार्शिटाकळी नगरपंचायत जि. अकोला यांच्यामार्फत खालील कामाकरीता अनुभवी निवीदा धारक अर्हता प्राप्त सेवा पुरवठादार यांच्याकडुन ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

**कामाचे नांव :** बार्शिटाकळी नगरपंचायत १५ वित्त आयोग व इतर अनुज्ञेय निधी यातुन बार्शिटाकळी नगरपंचायत घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार शहर स्वच्छतेच्या कामाकरीता ई-निविदा मागविण्यात येत आहे. www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर निविदा सादर कराव्यात मुख्याधिकारी, बार्शिटाकळी नगरपंचायत यांनी कोणत्याही प्रकारची ऑनलाईन निविदा स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचा अंतिम अधिकार राखून ठेवला आहे.

| कामाचे स्वरुप | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी सेवाकरासह | कालावधी |
|---|---|---|---|
| बार्शिटाकळी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरात दैनंदिन स्वच्छता विषयक साफ सफाईची सर्व कामे ठोक पध्दतीने करणे<br>कामाचे स्वरुप (SCOPE OF WORK)<br>१) कचरा मुक्त शहर हे कामाचे अंतिम उददीष्ट राहील.<br>२) बार्शिटाकळी शहरातील सर्व निवासी व वाणिज्य मालमत्तांचे प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन डोअर टु डोअर ओला व सुका कचरा विकेंद्रीत पध्दतीने वर्गीकरण करुन जमा करुन त्याची प्रकीयासाठी वाहतुक करणे<br>३)सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, अंत्यविधी ठिकाणे शैक्षणिक संकुल शहरातील दुकाने मार्केट, चिकन मार्केट, मटन व मासे मार्केटची व इतर अनुषंगिक ठिकाणे झाडलोट करणे व सदर ठिकाणचा कचरा विकेंद्रीत पध्दतीने वर्गीकरण करुन जमा करणे व प्रक्रियेच्या ठिकाणी वाहतूक करणे<br>४) डंपींग ग्राऊंड येथे आवश्यकतेनुसार ओला व सुका कचरा वर्गीकरण करुन डंप करणे व ओला कचरापासुन खतनिर्मीती करणे<br>५) शहरातील फुड वेस्ट स्वतंत्र पध्दतीने जमा करुन प्रक्रीयेच्या ठिकाणी वाहतुक करणे<br>६) तुंबलेले गटार लाईन पुर्ववत चालु करणे,चोकअप काढणे, पाऊसाचे पाणी जाणे करीता जे सी बी द्वारे नाली काढणे<br>७) बेवारस मृतदेह/ मृत जनावरे याची विल्हेवाट लावणे व ईतर आरोग्य विषयक कामे करणे.<br>८) गटार सफाई नंतर कचरा कुंडयावर टाकलेले मटेरीयल वाहतुक करणे.<br>९) संपुर्ण बार्शिटाकळी शहरामध्ये ट्रॅक्टरद्वारे/घंटागाडीद्वारे गोळा केलेला कचरा भरुन नगरपंचायत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या जागेवर वाहतुक करणे, दैनंदिन सर्व साफसफाई विषयक इतर सर्व कामे करणे. | ३,२०,८००/- | १५०००/- | कार्यादेश दिल्यापासुन १ वर्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| १०) दैनंदिन सर्व साफसफाई विषयक इतर सर्व कामे करणे. वरिल नमुद केलेले शहर स्वच्छतेची दैनंदिन सर्व कामे नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हताळणी) नियम २०१६ नुसार करणे | | | |

**नियम व अटी:**

१) कंत्राटदाराने वरील कामाची ठोक मासिक स्पर्धात्मक रक्कम BOQ मध्ये नमुद करावी. सदर रक्कम सर्व खर्च व सर्व करांसहीत असावी.

२) इसारा रक्कम ऑन लाईन पध्दतीने भरणा करावी.

३) निविदा दस्तऐवज ऑनलाईन सादर करावयाचा असल्याने पोस्ट किंवा कुरियरद्वारे निविदा कागदपत्रे स्विकारण्यांत येणार नाहीत.

४)सदरील ई- निविदा दि.१६/०५/२०२६ ते दि.२६/०५/२०२६ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरण्यासाठी उपलब्ध असतील. निविदा शक्य झाल्यास दि.२७/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०३:०० वा. नंतर ऊघडण्यात येतील.

५) सर्व पात्र ईच्छुक कंत्राटदार राज्य शासनाच्या विभागाकडे नोंदणी (पंजीकृत) असणे अनिवार्य आहे.

६)निविदेच्या तांत्रिक लिफाफा मध्ये निविदा प्रपत्राची फी व अनामत रक्कम भरल्याची पावती, नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, इन्कमटॅक्स रिटर्न (मागील आर्थीक ३ वर्षाचे) जी.एस.टी., ई.पी.एफ. व ई.एस.आय.सी प्रमाणपत्र, मशिनरी यादी, तांत्रिकस्टाफ व तत्सम काम केल्याबाबतचे प्रमाणपत्र निविदेसोबत दाखल करणे आवश्यक आहे.

७) निविदा सोबत न. प. सदस्य यांचा हिस्सा/ हितसंबध नसल्याचे प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा मध्ये निविदेसोबत दाखल करणे आवश्यक आहे.

८) अंतिम मंजूर निविदा धारकांनी रू.५ लाखासाठी रु ५०० व त्यावरील रकमेकरीता ०.३ टक्के दराने किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करून द्यावा लागेल

९) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ०७ दिवसात प्रत्यक्ष कामे सुरु करणे बंधनकारक आहे. सदरचे काम ०७ दिवसात सुरु न केल्यास सदर कामाची निविदा रद्द करुन संबंधित कंत्राटदारास काळया यादीत टाकण्यात येईल व उर्वरीत पात्र निविदा धारकापैकी निम्नतम दराच्या निविदाधारकाची निविदा स्विकारण्यात येईल.

१०) तांत्रीक लिफाफा उघडण्याचा दिनांक वेळापत्रकानुसार राहील. सदरील वेळेत बदल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगरपंचायत बार्शीटाकळी यांच्याकडे राहील तसेच लघुत्तम निविदा धारकाने कागदपत्रांची पुर्तता करणे कामी तात्काळ कार्यालयास संपर्क साधुन ०३ दिवसाच्या आत करारनामा करणे आवश्यक राहील. या बाबत कार्यालयाकडुन कोणतेही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. लघुत्तम निविदा धारकाने ०३ दिवसाच्या आत करारनामा न केल्यास त्याची बोली रद्द करण्यात येईल.

११) काम सुरू करण्यापूर्वी, काम चालू असताना व काम संपल्या नंतरचे फोटो काढून नगर पंचायत कडे सादर करावे लागतील.

१२) निधी उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल. याबाबत कुठल्याही प्रकारे युक्तीवाद चालणार नाही.

१३) सदर कामाचे देयक महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. संकीर्ण क्र २०१९/प.क्र.४९/नवि-४ दि. २० मे २०१९ च्या शासन परिपत्रकातील नियमावली प्रमाणे देयक अदा करण्यात येईल.

१४) खोटी कागदपत्रे सादर करणा-या कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारावर कायदेशीर कार्यवाही करून त्याला काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

१५) निविदा प्रक्रियेत कुठलीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार नगरपंचायत बार्शिटाकळी कार्यालयाने राखून ठेवला आहे.

१६) सदर कामाचे देयक १५ व्या वित्त आयोग व इतर अनुज्ञेय निधी मधुन निधी उपलब्धीनुसार अदा केले जाईल.

सा.प्र.

**मुख्याधिकारी**
**बार्शीटाकळी नगरपंचायत**

# बार्शिटाकळी नगरपंचायत

बार्शिटाकळी जि.अकोला.

दुरध्वनी क्र.07255-252825

Email: nagarpanchayat.barshitakali@gmail.com

"न प्रजाहिते श्रमविक्लवः"


---

## जाहिर ई- निविदा बाबत शर्ती व अटी

१) मक्तेदार पात्रता ऑनलाईन तात्रिंक लिफाफा मध्ये खालील प्रमाणे नमुद कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील.

- A- मागील तीन वर्षाचे आयकर विविरण पत्र
- B- सध्यास्थीतीत घनकचरा व्यवस्थापन मध्ये चालु वर्षात ७ नगरपंचायत/नगर परिषदमध्ये घनकचरा काम चालु असल्याचे कार्यारंभ आदेश जोडणे बंधनकारक राहील व सध्यस्थित कमीत कमी दोन नगर पंचायत / नगर परिषदचे कार्यारंभ आदेश असणे आवश्यक
- C- शॉप ऍक्ट लायसन्स
- D- ई.पी.एफ नोंदणी प्रमाणपत्र व कमीत कमी प्रति महिना १०० कामगारांचे ई.पी.एफ भरणा केल्याचे चलन जोडणे बंधनकरक आहे.
- E- निविदा धारकाने किमान १ कोटी रुपयेचे बँक सोल्वन्सी (Bank Solvenncy) निविदे सोबत देणे बंधनकारक आहे.
- F- निविदेतील आवश्यक ते प्रतिज्ञापत्र मुद्रांक शुल्क ५००/-च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून देणे बंधनकारक आहे.
- G- निविदा धारकाच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्या बाबतचे पॉवर ऑफ ॲटर्नी देणे बंधनकारक आहे.
- H- जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र व जी. एस. टी. आर. ३-बी व पॅन कार्ड जोडणे आवश्यक राहील.
- I- ISO 14001:2015 Environmental Management System Certified व ISO 45001:2018 Occupational Health and Safely Management System Certificate बंधनकारक राहील.
- J- बायोकॅटलिस्ट प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
- K- वाहन स्वत:च्या मालकीचे असणे, पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
- L- मागील वर्षात किमान दोन कोटीची उलाढाल असणे आवश्यक त्याबाबत सी. ए. यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
- M-महाराष्ट्र शासनाचे कमीत कमी २ नगरपंचायत / नगर परिषद यांना सेंद्रीयखताचे हरीत महासिटी कंपोस्ट ब्रॅन्ड मिळुन दिल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- N- किमान २ नगर परिषद /नगर पंचायत मध्ये मागील ६ महिन्यातील ICT QR कोड ६०% स्कॅनिंग चे डॅशबोर्ड वरील फोटो जोडणे बंधनकारक राहील.
- O- बार्शिटाकळी नगरपंचायत हददीतील सर्व कामकाजाचा कृती आराखडा तयार करून तांत्रिक लिफाफ्यासोबत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा सदरची निविदा अपात्र ठरवुन रदद करण्यात येईल.
- P- ESIC नोंदणी प्रमाणपत्र व चलन जोडणे बंधनकारक राहील.
- Q- ईसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यानंतर प्राप्त होणारी पावती जोडणे बंधनकारक राहील.
- R- निविदा समाप्ती नंतर हार्ड कॉपी ४८ तासाच्या आत नगरपंचायत कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.

S- Joint Venture ग्राहय धरले जाणार नाही.
T- निविदा धारकाने निविदे सोबत जोडलेले कार्यरंभ आदेश महाराष्ट्र शासनाचे सेंद्रीयखताचे हरीत महासिटी कंपोस्ट ब्रॅन्ड मिळुन दिल्याचे प्रमाणपत्र तसेच अनुभव प्रमाणपत्र तसेच बॅंक सॉल्वोन्सी (EPF ESIC) चलन सर्व कागदपत्रे संबंधीत कार्यालयाला पत्र व्यवहार करून नगरपंचायत बार्शिटाकळी खातीर जमा करून घेतल्याशिवाय आर्थीक लिफाफा उघडणार नाही. सदर कार्यालयाकडुन काही चुकीची माहिती प्राप्त झाल्यास सदरील एजंसीवर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

२. संबधित मक्तेदारांनी नमुद केलेले काम करण्यासाठी पुढील प्रमाणे वाहनांद्वारे (vehicle) काम करणे बंधनकारक राहील. या बाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही.

A. Tata Mint घंटागाडी ( घंटा बसविणे बंधनकारक)
B. Tractor And Hydraulic Trolley-

३. सर्व वाहन चालकाकडे वाहन परवाना असणे आवश्यक राहील. वहनांचा इंधन,रिपेअर्स व मेंटनेंस खर्च मक्तेदारास स्वत: करावा लागेल.

४. संबधित मक्तेदार यांनी कामगार, ड्रायव्हर,हेल्पर, सुपरवायझर, मॅनेजर असे मिळुन किमान आवश्यक मनुष्यबळ सदर कामासाठी वापरणे बंधनकारक राहील.

५. सर्व कामगार व इतर मनुष्यबळास वेतन व नियमानुसार देय समाजिक सुरक्षतेतेबाबतचे इतर लाभ देणे बंधनकारक राहील.

६. वेळोवेळी शासनाकडुन कंत्राटी कामगार संबंधी किमान वेतन तसेच शासनाच्या आदेशानुसार निर्गमीत होणाऱ्या सोई सुविधा पुरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

७. सर्व मनुष्यबळाचे ईपीएफ भरणे व त्याबाबतचे स्टेटमेंट सादर करणे बंधनकारक राहील.

८. सर्व मनुष्यबळाला ड्रेस कोड व ओळखपत्र असणे बंधनकारक राहील.

९. सर्व कामगारांना हॅंडग्लोज,मास्क, गमबुट इत्यादी साहित्य पुरवून काम करुन घेणे बंधनकारक राहील.

१०. बार्शिटाकळी शहरातील निघणारे संपुर्ण फुड वेस्ट जमा करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी व वाहन व्यवस्था करणे मक्तेदारास बंधनकारक राहील. जमा केलेले सर्व फुड वेस्ट प्रक्रियेसाठीच वापरणे बंधनकारक राहील.

११. स्वच्छतेचे काम दोन शिफ्ट मध्ये करणे बंधनकार राहील.

१२. मक्तेदाराच्या प्रत्येक मासीक बिलातुन ८% सुरक्षा अनामत कपात केली जाईल. सदर सुरक्षा अनामत लेखा परीक्षण पूर्ण झाल्यानंतर अदा केली जाईल.

१३. ठेकेदार यांनी नगरपंचायत बार्शिटाकळी कार्यालयातर्फे सादर केलेल्या अधिकृत ई निविदा पत्रात BOQ मध्येच दर भरणे आवश्यक राहील.

१४. निविदा मंजुरी नंतर स्वखर्चाने आवश्यक स्टॅम्प पेपर (Stamp paper) वर करारनामा करुन द्यावा लागेल.

१५. निविदा धारकाने करारनामा लिहुन दिल्यावर व बार्शिटाकळी नगरपंचायत दिलेल्या आदेशा नुसार कामकाज चालु करावयाचे आहे.

१६. ई-निविदा जाहीरातीतील अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहील.

१७. शासन नियमा नुसार उपरोक्त कामास बालमजुर लावता येणार नाही.

१८. शासन नियमानुसार सर्व कर मक्तेदाराच्या बिलातुन कपात करण्यात येईल.

१९. मक्तेदाराकडे काम करत असलेल्या कोणत्याही कर्मचा-यास कोठल्याही परिस्थितीत बार्शिटाकळी नगर पंचायतेकडे तात्पुरत्या स्वरुपात किंवा कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा अधिकार राहणार नाही.

२०. काम करत असताना कोणत्याही कर्मचा-याचा काही आपघात झाल्यास त्याबद्दल नियमानुसार आवश्यकती नुकसान भरपाई देणेची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

२१. वर नमुद केले व्यक्तीरीक्त स्वच्छताविषयक एखादया ठिकाणी निकडीचे काम निघाल्यास ते प्राधान्याने करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

२२. मक्तेदाराला शहर स्वच्छताविषयक तक्रारींचे निराकरण करणेबाबत नगरपंचायतद्वारे कळविल्यानंतर त्याबाबत छोटया तक्रारीसंबधी दोन तासाच्या आत व मोठया तक्रारीसंबधी पाच तासाच्या आत निराकरण करणे मक्तेदारास बंधनकार राहिल.

२३. जर निविदाधारक टेकनिकल बीडसाठी पात्र ठरला तरच त्याची फायनान्शीअल बीड उघडली जाईल.

२४. अपुर्ण टेंडर स्विकारले जाणार नाही.

२५. मक्तेदाराने लावलेल्या सर्व कर्मचा-यांना आवश्यक ते किमान वेतन व इतर सामाजीक सुरक्षेबद्दलचे लाभ देणे बंधनकारक राहील.

२६. मक्तेदाराने नेमुन दिलेले स्वच्छताविषयक काम करणेस कसूर केला आहे अशी मुख्याधिकारी बार्शिटाकळी नगरपंचायत यांची धारणा झाल्यास त्याबाबत मक्तेदाराच्या मासीक बिलातुन मुख्याधिकारी निर्धारीत करातील एवढी रक्कम कपात करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहील.

२७. निविदेमध्ये नगरपंचायतेच्या नगरसेवकांचा सहभाग नसल्याबाबत विहीत नमुन्यातील ५००/-चे स्टॅपवर केलेल्या प्रतिज्ञापत्राची मुळ प्रत सादर करणे आवश्यक आहे.

२८. बार्शिटाकळी शहरामध्ये अतिमहत्वाचे व्यक्ती/व्ही आय पी मंत्री महोदय येणार असल्यास त्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम राबविणे बंधनकारक राहील.
३०. शहर स्वच्छतेसाठी आवश्यक असणारे साहित्य उदा. पाटी, फावडे, झाडु, बादली, खराटे,टिकाव, पहार, घण, लोखडी रॉड, कु-हाड, दताळे, खुरपे,चेंबर सफाईसाठी सुरक्षा बेल्ट, चेंबर उघडण्यासाठी लोखडी पाना इ. साहित्य मक्तेदारास पुरवावे लागेल.

३१. सर्व स्वच्छताविषयक कामकाज हे घनकचरा व्यस्थापन हाताळणी नियम २०१६ अन्वये करावी लागेल.

३२. ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडयांना स्वतंत्र कंपाटमेंट करावे लागतील.

३३. सर्व घंटागाडयांना घंटा बसविणे बंधनकारक राहील.

३४. सर्व घंटागाडयांना GPS यंत्रणा बसविणे बंधनकारक राहील.

३५. घंटागाडयांचा ROUTE MAP तयार करुन त्यानुसार व निश्चित वेळेतच घंटागाडयांद्वारे नियीमत कचरा उचलणे बंधनकारक राहील.

३६. काम करत असताना मक्तेदाराकडे असलेल्या सर्व वाहनांची यादी क्रमांकसह नगरपंचायतेकडे जमा करावी लागेल.सर्व वाहनांचा विमा उतरविणे बाबतची जबाबदारी मक्तेदाराकडे राहील तसेच वाहनावरील सर्व ड्रायव्हरयांचेकडे वाहनपरवाना (लायसन्स) असणे बंधनकराक राहील.

३७. मंजुर निविदाधरक यांचे कर्मचा-यांनी संप पुकरल्यास सपं कालावधीत इतर कर्मचा-यांकडुन ठरले प्रमाणे सर्व काम करुन देणे मक्तेदारावर बंधनकारक राहील.

३८. नगरपंचायतेकडे उपलब्ध असलेले वाहने मक्तेदाराकडे वर्ग केल्यास त्याबाबतचे स्वतंत्र भाडे मक्तेदाराच्या मासीक बिलातुन कपात केले जाई. घंटागाडयांसाठी प्रती महा रु ९,०००/- ,ट्रॅक्टरसाठी प्रती माह रु १०,०००/- प्रमाणे ( इंधनविरहीत) भाडे राहील. सदर वाहने मक्तेदारास नको असतील तेंव्हा सुस्थितीत नगरपंचायतेकडे वर्ग करावे लागतील. सदर भाडे देयकातुन कपात करून नगर पंचायतेच्या वाहन घसारा मध्ये जमा करण्यात येईल.
३९. मक्तेदार व त्यांचे कर्मचारी यांचेमध्ये वाद निर्माण झाल्यास त्याबाबत नगरपंचायतेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही तर याबाबत सर्वस्वी जबाबदारी मक्तेदाराची राहील.
४०. मक्तेदाराचे मासीक बिल देण्यास कोठल्याही प्रशासकीय व तांत्रिक दिरंगाई झाल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही.

४१. मक्तेदार किंवा त्यांचे कर्मचारी यांना नगरपंचायत विरुध्द कुठल्याही कारणसाठी दावा दाखल करता येणार नाही.
४२. वरिल अटी व शर्ती व्यतीरिक्त शहर स्वच्छता विषयक आवश्यक असल्यास कोणत्याही नविन अटी व शर्ती घालण्याचा किंवा नमुद अटी शर्ती शिथील करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहील.
४३. कामासंदर्भात किंवा निविदा संदर्भात कोठलाही वादविवाद झाल्यास या बाबत मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

४४. वरील अटींची पुर्तता न झाल्यास बार्शिटाकळी न.प.मुख्याधिकारी यांचे प्रस्तावानुसार कोणत्याही क्षणी निविदा रद्द करण्याचा अधिकार नगरपंचायतेला राहील.
४५. सदरील घन कचरा व्यवस्थापनाचे काम हे कार्यारंभ आदेश मिळल्यापासून पुढील १ वर्षा साठी असेल.
४६.निविदेसोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे सही शिक्क्यासह साक्षांकित केलेली असावी.

**ई-निविदा पध्दतीचा तपशिल व वेळापत्रक :**

| S.R. No. | Online Date | Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Publish Date | 16/05/2026 | |
| 2 | Document Download / Sale Start Date | 16/05/2026 | |
| 3 | Document Download / End Sale Date | 26/05/2026 | 03:00 PM |
| 4 | Bid submission Start Date | 16/05/2026 | |
| 5 | Bid submission End Date | 26/05/2026 | 03:00 PM |
| 6 | Bid Opening Date (Technical) | 27/05/2026 | 03:00 PM(After) |
| 7 | Bid Opening Date (Financial) | 29/05/2026 | 03:00 PM(After) |

सा.प्र.

मुख्याधिकारी
बार्शिटाकळी नगरपंचायत

# परिशिष्ट -
## प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही याद्वारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगरपंचायत, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमचे कलम १६(१)(आय) व कलम ४४(१)(ब) तरतुदीच्या, ज्या खालील उदधृत केलेल्या आहेत, माहिती आहेत. आणि गंभीरपणे नमुद करतो की, नगर पालिकेशी किंवा नगरपंचायतेच्या अधिन किंवा नगर पालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदे मध्ये नगरपंचायतेच्या कोणताही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमचेशी भागेदारी नाही.

**कलम १६(१)** :- यापुढे तरतुद केली असेल त्याव्यतिरीक्त, नगरपालिकेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारा मार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.

**कलम ४४ (१)(ब)** :- पालिका सदस्य म्हणुन किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोट कलम (३), खंड (अ), (ब), (क), (ई) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याचा भागिदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरितेने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अशा हिश्श्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जीत त्याच्या अशीलाच्या, प्रकल्पाच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यवसायीक दृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल आशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

**निविदा धारकाचे नांव : ........................................**
**पत्ता : ............................................................**

निविदाधारकाची स्वाक्षरी

दिनांक :     /     /२०२६

**साक्षीदाराचे नांव : .................................**

**पत्ता : ...............................................**

दिनांक :     /     /२०२६

साक्षीदाराची स्वाक्षरी

**(केंद्रशासन अथवा राज्यशासन यांचेकडून कधीही काळया यादीत टाकण्यात आले नाही तसेच संस्थेवर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचे फौजदारी गुन्हा नसल्याबाबत तसेच कामाचे हमीपत्राचा नमुना)**

# प्रतिज्ञापत्र

मी खालील सही करणार ------------------------------------------------ (नाव, पत्ता, संस्थेचे नाव) प्रतिज्ञापुर्वक लिहून देतो/देते की, दिनांक / /२०२६ रोजी दिलेल्या जाहीरातीनूसार मी माझ् संस्थेतर्फे ------------------------------------- या कामाची निवीदा सादर करीत आहे. सदर निवीदा सुचनेतील व निवीदा नमून्यातील नमूद केलेल्या सर्व अटी शर्ती मी वाचलेल्या असून त्या सर्व अटी शर्ती मला मान्य आहे. माझ्या संस्थेचे नाव केंद्र शासन अथवा राज्य शासन यांचेकडून कधीही काळया यादीत टाकण्यात आलेले नाही तसेच माझ्या संस्थेवर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा नाही.

तसेच माझी नवीदा मंजूर झाल्यास मी प्रामाणिकपणे व पूर्ण क्षमतेने निवीदेतील नमूद काम पार पाडेल या बाबत माझेकडून कोणतीही हयगय अथवा निष्काळजीपणा झाल्यास नगर पंचायतेचे होणारे नुकसान मी स्वखर्चाने भरून देईल. नगर पंचायतेच्या हितास बाधा पोहोचेन असे कोणतेही वर्तन मी करणार नाही.

वरीलप्रमाणे सर्व मजकुर हे सत्य असून तशी बाब आढळून आल्यास मी सादर केलेली निवीदा रद्द होईल व त्याबाबत होणाऱ्या पुढील कायदेशिर कार्यवाहीस मी पात्र राहील. याबाबत मी कोणत्याही प्रकारची तक्रार करणार नाही. हे मी प्रतिज्ञापूर्वक लिहून देत आहे.

**सही व संस्थेचा शिक्का**

(ई-निविदेसोबतचे तांत्रिक कादगपत्रांचे सत्यतेबाबत सादर करावयाचे प्रतिज्ञापत्राचा नमुना)

## प्रतिज्ञापत्र

मी श्री./श्रीमती ---------------------------------------- वय ------- वर्षे, राहणार -------------------------------- या सत्य प्रतिज्ञापत्रलेखाव्दारे लिहून देतो की, मी -------------------------------- या संस्थेचा/कंपनीचा प्रोप्रायटर असून ------------------------------------ या कामासाठी मी ई-निवीदा सादर केली आहे. सदर ई-निवीदेची तांत्रिक बार्बीची कागदपत्रे मी सादर (Upload) केली आहेत. ती सर्व तांत्रिक कागदपत्र खरी, बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी , चुका नाहीत. असे शपथपूर्वक मान्य करीत आहे. सदर कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभुल करणारी, खोटी तसेच अपूर्ण माहीती आढळल्यास त्यास मी कोणत्याही कार्यवाहीस पात्र आहे व राहीन.

**सही व संस्थेचा शिक्का**
**मोबाईल. नं.**

Signature Not Verified

Digitally signed by PRASHANT NANDKISHOR WAGH
Date: 2026.05.16 14:44:22 IST
Location: Maharashtra-MH